ePaper

**मोठा दिलासा देणारी बातमी! 11 जहाजे भारताच्या दिशेने निघाली; कच्चे तेल, एलपीजी, खत**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 24 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

ताथवडेत साकारणार अत्याधुनिक पोलीस मुख्यालय!

## रोहित शर्मासह हॉकीपटू सविता पुनियाचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान

# नामांकित खेळाडूंना 'पद्मश्री' गौरव.!

**महाईन्यूज । मुंबई**

**राष्ट्रपती भवनात मंगळवारी झालेल्या दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील प्रतिष्ठित ‘पद्म’ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा आणि भारतीय महिला हॉकी संघाची माजी कर्णधार सविता पुनिया यांना ‘पद्मश्री’ पुरस्काराने गौरविण्यात आले. तर भारताचे ज्येष्ठ टेनिसपटू विजय अमृतराज यांना ‘पद्मभूषण’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.**




### सविता पुनिया आणि विजय अमृतराज यांचा ऐतिहासिक बहुमान!

भारतीय महिला हॉकी संघाची भिंत समजली जाणारी गोलकीपर आणि माजी कर्णधार सविता पुनियालाही हॉकीमधील तिच्या अतुलनीय योगदानासाठी पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले. दुसरीकडे, यंदा क्रीडा क्षेत्रातून देशाचा तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान ‘पद्मभूषण’ मिळवणारे विजय अमृतराज हे एकमेव खेळाडू ठरले आहेत. टेनिस कोर्टवरील त्यांच्या ऐतिहासिक कारकिर्दीसाठी त्यांना हा पुरस्कार मिळाला. यापूर्वी त्यांना १९७४ मध्ये अर्जुन पुरस्कार आणि १९८३ मध्ये पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले होते. या सोहळ्यात मध्य प्रदेशचे भगवानदास रायकवार यांना मरणोत्तर पद्मश्री प्रदान करण्यात आली.

### ‘चॅम्पियन्स ट्रॉफी’ विजयाचा शिल्पकार रोहित शर्माचा सन्मान!

माजी कर्णधार रोहित शर्मासाठी हा बहुमान अत्यंत खास आहे. रोहितच्याच नेतृत्वाखाली भारताने २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक आणि २०२५ मध्ये आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीवर आपले नाव कोरले होते. रोहितने २०२५ मध्ये कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली असली, तरी वन-डे क्रिकेटमध्ये त्याचे वादळ अजूनही कायम आहे. गेल्या वर्षी त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये ६५० हून अधिक धावा ठोकून संघात मोलाचे योगदान दिले होते.

भारतीय क्रिकेटला अनेक संस्मरणीय विजय मिळवून देणाऱ्या रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक आणि २०२५ मध्ये आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. २०२५ मध्ये कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतरही तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतासाठी योगदान देत आहे. गेल्या वर्षी त्याने वन-डे क्रिकेटमध्ये ६५० हून अधिक धावा करत संघाच्या यशात मोलाची भूमिका बजावली.

भारतीय महिला हॉकी संघाची माजी कर्णधार आणि अनुभवी गोलरक्षक सविता पुनिया हिला हॉकी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महिला हॉकीमध्ये तिच्या नेतृत्वाची आणि कामगिरीची दखल घेत हा बहुमान प्रदान करण्यात आला.

दरम्यान, भारताचे दिग्गज टेनिसपटू विजय अमृतराज यांना टेनिस क्षेत्रातील दीर्घ आणि उल्लेखनीय योगदानासाठी ‘पद्मभूषण’ पुरस्काराने गौरविण्यात आले. यापूर्वी त्यांना १९७४ मध्ये अर्जुन पुरस्कार आणि १९८३ मध्ये पद्मश्री पुरस्कार मिळाला होता. यंदा क्रीडा क्षेत्रातून पद्मभूषण मिळवणारे ते एकमेव खेळाडू ठरले.

या सोहळ्यात मध्य प्रदेशचे भगवानदास रायकवार यांना मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. केंद्र सरकारने यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा केली होती. काही दिवसांपूर्वी भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिनेही राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार स्वीकारला होता.

# होणाऱ्या बायकोनेच जीव घेतला!

## लोहगडावरुन दरीत पडून तरुणाच्या मृत्यू प्रकरणात ट्विस्ट; मित्रासह 8 जणांवर गुन्हा

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा केतन अग्रवाल (वय २६) याच्या लोहगड किल्ल्यावरील संशयास्पद मृत्यूचा छडा लावण्यात पुणे ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. सुरुवातीला 'ट्रेकिंग' दरम्यान झालेला अपघात वाटणाऱ्या या घटनेमागे एक भयंकर आणि क्रूर कट असल्याचे तपासात उघड झाले आहे. केतनची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांनी मिळून हा पूर्वनियोजित खून केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून, पोलिसांनी या दोघांनाही बेड्या ठोकल्या आहेत.**





गहुंजे (पुणे) येथील रहिवासी असलेले केतन अग्रवाल हे त्यांच्या कौटुंबिक रिअल इस्टेट कंपनीत संचालक म्हणून कार्यरत होते. घरच्यांनी त्यांच्यासाठी २० वर्षीय सिया गोयल हिचे स्थळ शोधले होते. सियाचे कुटुंब ड्रायफ्रूट्सच्या व्यवसायात असून, ती कॉमर्सची विद्यार्थिनी होती आणि स्वतःचा बेकरी व्यवसाय सुरू करण्याच्या प्रयत्नात होती.

दोन्ही कुटुंबांच्या संमतीने चालू वर्षाच्या अखेरीस त्यांचा विवाह निश्चित झाला होता. राजस्थानमधील उदयपूर येथे या शाही विवाहसोहळ्याचे भव्य नियोजन करण्यात आले होते आणि त्यासाठीची पूर्वतयारीही पूर्ण झाली होती. मात्र, या आनंदाच्या वातावरणात केतन एका धोकादायक 'लव्ह ट्रँगल'चा (प्रेम त्रिकोण) बळी ठरेल, याची कोणालाही पुसटशी कल्पना नव्हती.

दोन्ही कुटुंबांमध्ये लग्नाची गडबड सुरू असताना, सियाचे मात्र तिच्याच ओळखीतील २२ वर्षीय चेतन चौधरी याच्यावर प्रेम होते. चेतनचे कुटुंबही ड्रायफ्रूट्सच्याच व्यवसायात आहे.

"सियाचे केतनशी लग्न ठरले होते, मात्र तिची या लग्नाला अजिबात इच्छा नव्हती. तिला चेतनसोबतच राहायचे होते. यातूनच सिया आणि चेतनने मिळून केतनला वाटेतून हटवण्याचा अत्यंत भयानक कट रचला," अशी माहिती पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### दोनवेळा प्रयत्न हुकला, तिसऱ्यांदा घात केला

पासपोर्टची युक्ती यशस्वी झाल्यानंतर सियाने केतनला ट्रेकिंगच्या बहाण्याने लोहगडावर आणण्याचा प्लॅन केला. १८ जूनच्या आधी तिने केतनला दोन वेळा लोहगडावर आणले होते. मात्र, त्या दोन्ही वेळेस गर्दीमुळे किंवा योग्य संधी न मिळाल्यामुळे त्यांना कट पूर्ण करता आला नाही. अखेर १८ जून रोजी तिसऱ्या प्रयत्नात त्यांनी केतनला दरीत ढकलून आपला क्रूर डाव साधलाच.

### नेमकं काय घडलं?

नियोजित कटानुसार, १८ जून रोजी सिया केतनला घेऊन लोणावळ्याजवळील ऐतिहासिक लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेली. तिचा प्रियकर चेतन चौधरी आधीच तिथे दबा धरून बसला होता. सिया आणि केतन किल्ल्यावर चढत असताना चेतन त्यांच्या मागे-मागे गेला. एका निर्जन आणि खोल दरी असलेल्या ठिकाणी पोहोचताच, सिया आणि चेतनने मिळून केतनला थेट ४०० फूट खोल दरीत ढकलून दिले. यानंतर सियाने स्वतः पोलिसांना फोन करून, "केतनचा फोटो काढताना पाय घसरला आणि तो दरीत पडला," असा बनाव रचला. पोलिसांनी मृतदेह बाहेर काढून सुरुवातीला अपघाती मृत्यूची नोंद केली होती. मात्र, केतनच्या कुटुंबीयांना संशय आल्याने पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि सखोल चौकशी केली, ज्यामध्ये या संपूर्ण हत्येचा पर्दाफाश झाला.

---

# म्हाडाच्या पुणे मंडळाच्या ७९२ घरांसाठी गुरुवारी सोडत!

**महाईन्यूज । पुणे**

**म्हाडाच्या पुणे मंडळाच्या ताथवडे प्रकल्पातील ७९२ घरांच्या सोडतीसाठी एप्रिलमध्ये नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. ही प्रक्रिया पूर्ण झाली असून आता गुरुवारी या घरांसाठी पुण्यात सोडत काढली जाणार आहे. मात्र या घरांना अत्यल्प प्रतिसाद मिळाला असून मध्यम उत्पन्न गटातील घरे इच्छुकांनी, अर्जदारांनी नाकारली आहेत. मध्यम उत्पन्न गटातील ७६८ घरांसाठी अनामत रकमेसह केवळ ३०९ अर्ज सादर झाले आहेत. त्यामुळे ३०९ अर्जदार सोडतीआधीच विजेते ठरले आहेत.**



पुणे मंडळाने काही वर्षांपूर्वी ताथवडे येथे जमीन खरेदी करून या जमिनीवर दोन टप्प्यांत घरे बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील ६०० हून अधिक घरे बांधून त्यांची विक्री पूर्ण केली आहे. दुसऱ्या टप्प्यातील ७९२ घरांचे काम अंतिम टप्प्यात आहे. या निर्माणाधीन ७९२ घरांसाठी सोडत काढण्याचा निर्णय घेत २७ एप्रिलपासून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृतीस सुरुवात केली. यात अल्प उत्पन्न गटातील २४ आणि मध्यम उत्पन्न गटातील ७६८ घरांचा समावेश होता. ४६ लाख ते ६५ लाख ५० हजार रुपये अशा किमती असलेल्या या घरांसाठीची सोडतपूर्व प्रक्रिया नुकतीच संपुष्टात आली असून या घरांना अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्प उत्पन्न गटातील २४ घरांना चांगला प्रतिसाद मिळाला आहे. २४ घरांसाठी अनामत रकमेसह ४६० अर्ज दाखल झाले आहेत. मध्यम उत्पन्न गटातील ७६८ घरांना मात्र प्रतिसादच मिळालेला नाही. ७६८ घरांसाठी अनामत रकमेसह केवळ ३०९ अर्ज दाखल झाले आहेत.

### मध्यम उत्पन्न गटातील ४५९ घरांना शून्य प्रतिसाद

मध्यम उत्पन्न गटातील ७६८ घरांसाठी केवळ ३०९ अर्ज आल्याने तब्बल ४५९ घरे अर्जाविना रिक्त राहिली आहेत. कमी अर्ज आल्याने सर्वच्या सर्व ३०९ अर्जदार सोडतीआधीच विजेते ठरले आहेत. त्यामुळे आता केवळ अल्प उत्पन्न गटातील २४ घरांच्या सोडतीकडे अर्जदारांचे लक्ष लागले आहे. गुरुवारी, २५ जूनला दुपारी १२.३० वाजता सोडत काढली जाणार आहे. तेव्हा या सोडतीत २४ विजेते नेमके कोण ठरतात, याकडे अर्जदारांचे लक्ष लागले आहे. तर मध्यम गटातील रिक्त घरांबाबत म्हाडाच्या पुणे मंडळाकडून काय निर्णय घेतला जातो हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

# ताथवडेत साकारणार अत्याधुनिक पोलीस मुख्यालय!

## २० हेक्टर जमीन हस्तांतरणाचा मार्ग मोकळा; महिन्याभरात मंत्रिमंडळाचा अंतिम निर्णय अपेक्षित

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय, परेड ग्राऊंड आणि इतर अनुषंगिक कार्यालयांसाठी ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या अधिपत्याखालील २० हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याचा मार्ग मोकळा झाला असून, यासंदर्भातील शासन निर्णय येत्या काही दिवसांत जारी होणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. तसेच, याबाबत महिन्याभरात मंत्रिमंडळात आवश्यक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.**



पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनासाठी स्वतंत्र आणि सुसज्ज मुख्यालय उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा आमदार महेश लांडगे यांनी राज्य शासनाकडे केला होता. त्यांच्या प्रयत्नांना आता यश येताना दिसत आहे. याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

यावेळी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, मंत्रिमंडळाच्या दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत ताथवडे येथील वळुभाता प्रक्षेत्रातील एकूण ६७.९४ हेक्टर क्षेत्रापैकी २० हेक्टर जमीन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय, परेड ग्राऊंड व इतर आवश्यक कार्यालयांसाठी हस्तांतरित करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार गृह विभागाने महसूल विभागाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविला आहे.

या प्रस्तावासंदर्भात काही विभागांकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. पशुसंवर्धन विभागाने संबंधित जागेची आवश्यकता असल्याचे नमूद केले असले, तरी शहराच्या कायदा व सुव्यवस्था व्यवस्थेसाठी आधुनिक पोलीस मुख्यालयाची गरज लक्षात घेऊन शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

> “पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या विस्तारामुळे स्वतंत्र आणि अत्याधुनिक पोलीस आयुक्तालयाची गरज अनेक वर्षांपासून भासत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात स्वतंत्र आयुक्तालय सुरू झाले. आता ताथवडे येथे पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय उभारण्यासाठी आवश्यक जमीन हस्तांतरणाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या अंतिम टप्प्यात आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत सकारात्मक आश्वासन दिले असून, येत्या महिनाभरात मंत्रिमंडळात निर्णय होण्याची अपेक्षा आहे. पोलीस प्रशासनाला सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यास शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होईल आणि नागरिकांना अधिक प्रभावी व जलद सेवा मिळेल. हा प्रकल्प पिंपरी-चिंचवडच्या सुरक्षित आणि नियोजित विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

आमदार महेश लांडगे यांनी याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच महसूल आणि गृह विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे पोलीस आयुक्तालयासाठी स्वतंत्र प्रशासकीय संकुल उभारण्याचा महत्त्वाचा टप्पा आता पूर्णत्वास येत आहे.

यासंदर्भात आमदार महेश लांडगे म्हणाले, “पिंपरी-चिंचवड हे राज्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक आहे. शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक व सर्व सुविधांनी युक्त पोलीस आयुक्तालय उभारणे अत्यावश्यक होते. राज्य शासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून लवकरच अंतिम निर्णय होईल. त्यामुळे शहराच्या सुरक्षा व्यवस्थेला मोठे बळ मिळणार आहे.”

### शहराच्या सुरक्षा व्यवस्थेला मिळणार नवे बळ

ताथवडे येथे पोलीस मुख्यालय, परेड ग्राऊंड आणि प्रशासकीय संकुल उभारण्यासाठी २० हेक्टर जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून, महिन्याभरात मंत्रिमंडळाचा निर्णय अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला आधुनिक पायाभूत सुविधा मिळून शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.

# भामा-आसखेड जलवाहिनीचे काम ९ ते १० महिन्यांत पूर्ण होणार!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भामा-आसखेड धरणातून पिंपरी-चिंचवड शहराला १६७ एमएलडी अतिरिक्त पाणी मिळवून देणाऱ्या महत्त्वाकांक्षी जलवाहिनी प्रकल्पाच्या विलंबाबाबत भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी चालू विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला. शहराचा पाण्याचा प्रश्न तातडीने सुटावा आणि प्रकल्पात चालढकल करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी आमदार गोरखे यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यांच्या या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जुन्या वादग्रस्त ठेकेदाराला हटवून आता दोन नव्या निविदा काढून युद्धपातळीवर काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.**

> पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वेगाने होत असून नागरिकांना मुबलक पाणी मिळणे हा त्यांचा हक्क आहे. भामा-आसखेड प्रकल्पाच्या कामात झालेला विलंब अजिबात खपवून घेतला जाणार नाही. यापूर्वी ज्यांनी कामात हलगर्जीपणा केला, त्यांच्यावर कारवाईची मागणी मी लावून धरली होती. आता शासनाने नवीन कंत्राटदारांमार्फत ९ ते १० महिन्यांची कडक मुदत देऊन काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रशासनाने दिलेल्या या मुदतीत काम पूर्ण करून घेण्यासाठी आणि पिंपरी-चिंचवडकरांच्या घराघरात पाणी पोहोचेपर्यंत माझा हा पाठपुरावा अविरत सुरूच राहील.
>
> **- अमित गोरखे, आमदार, विधान परिषद**




आमदार अमित गोरखे यांनी अधिवेशनात अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. पिंपरी-चिंचवडकरांना हक्काचे पाणी मिळवून देणारा भामा-आसखेड प्रकल्प वेळेत का पूर्ण झाला नाही? तसेच काम रखडवणाऱ्या आणि काळ्या यादीत नाव असलेल्या ठेकेदारालाच पुन्हा काम दिले गेले आहे काय? असा थेट सवाल आमदार अमित गोरखे यांनी विचारला होता. यावर उपमुख्यमंत्र्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करत ‘काळ्या यादीतील ठेकेदाराला पुन्हा काम दिलेले नाही’ असे स्पष्ट केले. तसेच, प्रकल्पाचा विलंब टाळण्यासाठी आणि काम तातडीने पूर्ण करण्यासाठी जुन्या कंत्राटदारावरील कारवाईनंतर आता नवीन पारदर्शक पद्धतीने दोन वेगवेगळ्या निविदा प्रक्रिया राबवण्यात येत असल्याची अधिकृत माहिती शासनाने दिली.

### शासनाची नवी कृती योजना

भामा-आसखेड जलवाहिनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने सुमारे ८४ कोटी रुपयांच्या दोन स्वतंत्र निविदा काढल्या आहेत. गुरुत्वनलिकेचे उर्वरित काम १० महिन्यांत, तर रायझिंग मेनचे काम ९ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, प्रकल्पाला गती देण्यासाठी नव्या कंत्राटदारांमार्फत काम युद्धपातळीवर सुरू करण्यात येणार आहे.



## भूमिका

**भारतीय लोकशाही ही विविधतेने नटलेली व्यवस्था आहे. राष्ट्रीय, प्रादेशिक आणि राज्यस्तरीय अशा शेकडो राजकीय पक्षांनी गेल्या अनेक दशकांत देशाच्या राजकारणाला आकार दिला. मात्र अलीकडच्या काळात राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होताना दिसत आहेत. अनेक प्रभावशाली प्रादेशिक पक्षांत फूट पडत असून राष्ट्रीय पक्षांचे वर्चस्व वाढत आहे.**

# भारतीय लोकशाहीतील नवे राजकीय मंथन



त्यामुळे भारताची राजकीय वाटचाल द्विपक्षीय व्यवस्थेकडे होत आहे का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

एकेकाळी प्रादेशिक पक्ष हे राज्यांच्या अस्मिता, भाषा, संस्कृती आणि स्थानिक प्रश्नांचे प्रभावी प्रतिनिधित्व करीत होते. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस, तामिळनाडूमध्ये द्रमुक-अण्णाद्रमुक, महाराष्ट्रात शिवसेना, उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष किंवा बिहारमध्ये प्रादेशिक पक्षांनी आपला प्रभाव निर्माण केला. या पक्षांचे नेतृत्व करिष्माई व्यक्तिमत्त्वांकडे होते आणि त्यांच्या वैयक्तिक लोकप्रियतेवर पक्षांची उभारणी झाली होती.

मात्र काळ बदलत गेला तसे या पक्षांतील अंतर्गत मतभेद, नेतृत्वाचा अभाव आणि सत्तेची स्पर्धा यामुळे अनेक पक्षांना फूट पडू लागली. महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील विभाजन, तामिळनाडूतील अण्णाद्रमुकची झालेली घसरण किंवा इतर राज्यांतील राजकीय स्थलांतर याकडे त्याची उदाहरणे म्हणून पाहता येते. अनेक पक्षांमध्ये विचारसरणीपेक्षा व्यक्तिकेंद्री नेतृत्वाला अधिक महत्त्व मिळाल्याने नेतृत्व कमकुवत होताच संघटनाही ढासळल्या.

या प्रक्रियेत राष्ट्रीय पक्षांची ताकद वाढताना दिसते. भाजपने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशव्यापी विस्तार साधला आहे. दुसरीकडे काँग्रेसची ताकद पूर्वीइतकी नसली तरी ती अजूनही भाजपसमोरील प्रमुख राष्ट्रीय पर्याय म्हणून उभी आहे. त्यामुळे राजकारणाचे ध्रुवीकरण भाजप आणि काँग्रेस या दोन केंद्रांभोवती होत असल्याचे चित्र दिसते.

यामागे मतदारांच्या अपेक्षांतील बदलही महत्त्वाचा घटक आहे. आजचा मतदार केवळ जात, भाषा किंवा प्रादेशिक अस्मिता यापुरता मर्यादित राहिलेला नाही. विकास, रोजगार, पायाभूत सुविधा आणि प्रभावी प्रशासन यांना तो अधिक महत्त्व देत आहे. राष्ट्रीय पातळीवर स्पष्ट नेतृत्व आणि स्थिर सरकार देण्याची क्षमता असलेल्या पक्षांकडे त्याचा कल वाढत आहे.

तथापि, भारत पूर्णपणे द्विपक्षीय व्यवस्थेकडे जाईल, असे म्हणणे अद्याप घाईचे ठरेल. देशाची सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक विविधता लक्षात घेतली तर प्रादेशिक पक्षांचे महत्त्व कायम राहणार आहे. अनेक राज्यांमध्ये स्थानिक प्रश्नांवर आधारित पक्ष आजही प्रभावी आहेत. त्यामुळे राष्ट्रीय पक्षांचे वर्चस्व वाढले तरी प्रादेशिक शक्ती पूर्णपणे संपुष्टात येतील, असे मानता येणार नाही.सध्याचे राजकीय मंथन मात्र एका नव्या वास्तवाकडे निर्देश करते. व्यक्तिकेंद्री आणि कुटुंबकेंद्री राजकारणाची पकड सैल होत आहे, तर व्यापक संघटनात्मक ताकद आणि राष्ट्रीय दृष्टिकोन असलेल्या पक्षांचे महत्त्व वाढत आहे. यामुळे अधिक स्थिर आणि परिणामकारक शासनव्यवस्था निर्माण होण्याची शक्यता आहे.

मात्र याचबरोबर सत्तेचे केंद्रीकरण वाढण्याचा धोका देखील नाकारता येत नाही. भारतीय राजकारण सध्या संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. या प्रक्रियेत लोकशाही अधिक मजबूत होईल की सत्ता मोजक्या हातांत केंद्रित होईल, याचे उत्तर भविष्यात मिळेल. मात्र प्रादेशिक पक्षांच्या पारंपरिक वर्चस्वाला आव्हान निर्माण झाले असून राष्ट्रीय राजकारणाच्या नव्या अध्यायाची सुरुवात झाल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.

## प्रासंगिक »

### अविचार

**एका जंगलात एक शिकारी शिकार करण्यासाठी फिरत होता. त्याला एक सुंदर कोल्हा दिसला. त्या कोल्ह्याचे कातडे मिळवावे अशी त्याची इच्छा झाली. त्याने कोल्ह्याच्या बिळाजवळ एक खोल खड्डा खणला.**

खड्ड्यावर वाळलेल्या झुडपांचे आच्छादन करून त्यावर मांसाचा मोठा तुकडा ठेवला. कोल्हा मांसाच्या मोहाला बळी पडून खड्ड्यात पडेल, असा त्याचा अंदाज होता.

काही वेळाने कोल्हा बाहेर आला. त्याने मांसाचा तुकडा पाहिला; पण त्याला संशय आला. त्यामुळे तो सावधपणे पुन्हा बिळात जाऊन बसला. थोड्याच वेळात तेथे एक भुकेला वाघ आला. कोणताही विचार न करता त्याने मांसावर झडप घातली आणि तो थेट खड्ड्यात पडला.

वाघ पडल्याचा आवाज ऐकून शिकारी धावत आला. खड्ड्यात कोल्हा अडकला असे समजून त्याने आत उडी मारली. पण खड्ड्यात वाघ असल्याचे पाहून त्याला पळण्याची संधीच मिळाली नाही. वाघाने त्याच्यावर हल्ला करून त्याला ठार केले.

- तात्पर्य : अविचाराने नेहमी अनर्थ घडत असतात.

महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम क्षेत्र पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय कंत्राटदार अधिवेशनात एका पदाधिकाऱ्याने बांधकाम खात्यातील कथित ‘टक्केवारी’ व्यवस्थेचा जाहीर उल्लेख केला.

# ‘टक्केवारी’च्या जाळ्यात अडकलेले बांधकाम खाते



कामांच्या मंजुरीपासून देयकांपर्यंत विविध स्तरांवर होणाऱ्या आर्थिक व्यवहारांचा तपशील मांडत त्यांनी संपूर्ण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विशेष म्हणजे या आरोपांवर संबंधित लोकप्रतिनिधी, अधिकारी किंवा अभियंता संघटनांकडून ठोस प्रतिक्रिया आलेली नाही. त्यामुळे या आरोपांचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

सार्वजनिक बांधकाम खाते हे राज्याच्या विकासाचा कणा मानले जाते. रस्ते, पूल, उड्डाणपूल, शासकीय इमारती आणि पायाभूत सुविधा उभारण्याची जबाबदारी या विभागावर आहे. राज्याच्या अर्थसंकल्पातील मोठा हिस्सा या खात्यावर खर्च केला जातो. त्यामुळे या विभागातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अत्यंत महत्त्वाचे ठरते. मात्र, गेल्या काही वर्षांत या खात्याची प्रतिमा गुणवत्तेपेक्षा कथित भ्रष्टाचार, पोस्टिंगसाठीची स्पर्धा आणि आर्थिक व्यवहारांच्या चर्चेमुळे अधिक मलीन झाली आहे. याहून गंभीर बाब म्हणजे गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेबाबत निर्माण झालेला अविश्वास.

दर्जेदार कामांची खात्री करण्यासाठी असलेली यंत्रणा प्रभावीपणे काम करत नसल्याची भावना निर्माण झाली आहे. दोषी आढळलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर किरकोळ कारवाई होत असल्याने जबाबदारीची भावना कमी होत असल्याचे दिसते. परिणामी, निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत जनतेच्या मनात संशय कायम राहतो. कंत्राटदारांच्या थकीत देयकांचा वाढता प्रश्नही चिंताजनक आहे. सुमारे ९० हजार कोटी रुपयांच्या थकीत देयकांचा उल्लेख करण्यात आला आहे. निधीची उपलब्धता नसताना मोठ्या प्रमाणात कामांच्या निविदा काढल्या गेल्याचा आरोप केला जातो. यामुळे अनेक कंत्राटदार आर्थिक संकटात सापडले असून काहींनी टोकाची पावले उचलल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. विकासकामांचा वेग टिकवून ठेवताना आर्थिक शिस्त पाळणे तितकेच आवश्यक आहे, याची जाणीव शासनाने ठेवली पाहिजे.

महाराष्ट्राच्या विकासासाठी सक्षम आणि पारदर्शक बांधकाम व्यवस्था आवश्यक आहे. त्यासाठी आरोपांची निष्पक्ष चौकशी, गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा अधिक मजबूत करणे, पोस्टिंग प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि थकीत देयकांवर ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. विकासाची चमकदार चित्रे तेव्हाच अर्थपूर्ण ठरतील, जेव्हा त्यामागील व्यवस्था स्वच्छ, जबाबदार आणि विश्वासार्ह असेल. जनतेचा विश्वास मिळविण्यासाठी आता केवळ घोषणांपेक्षा कृतीची आवश्यकता आहे.

## ।। अभंगवाणी ।।



त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा ।
कठिण हें जिवा तोंचिवरी ॥१॥

मागिलांचे दुख्ख लागों नेदी अंगा ।
अंतर हें संगा नेदी पुढें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# विलास घुले हत्याप्रकरण विधानसभेत

## धनंजय मुंडेंची 'मास्टरमाईंड' शोधण्याची मागणी, पंकजा मुंडेंनीही घेतली भूमिका

**महाईन्यूज । मुंबई**

**केज तालुक्यातील विलास घुले हत्याप्रकरणाचे पडसाद मंगळवारी विधिमंडळात उमटले. या प्रकरणात पोलिसांनी केवळ प्रत्यक्ष आरोपींपर्यंत न थांबता कटाचा सूत्रधार कोण आहे, याचाही शोध घ्यावा, अशी जोरदार मागणी परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी विधानसभेत केली. तर, मंत्री पंकजा मुंडे यांनीही या घटनेला अत्यंत दुर्दैवी संबोधत दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी भूमिका स्पष्ट केली.**






केजमध्ये २० जूनच्या रात्री घडलेल्या घटनेत एका व्यक्तीवर हल्ला करण्यासाठी रचलेल्या कटादरम्यान विलास घुले यांचा जीव गेला. भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या विलास घुले यांच्यावर हल्लेखोरांनी वार केल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमागे पूर्वनियोजित कट असल्याचा आरोप करत धनंजय मुंडे यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला.

घुले कुटुंबीयांना न्याय मिळावा, यासाठी केज शहरात मोठ्या प्रमाणात जनआंदोलन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. हजारो नागरिक रस्त्यावर उतरले असून पोलिसांनी या प्रकरणातील सर्व धागेदोरे तपासून खऱ्या सूत्रधारापर्यंत पोहोचावे, अशी मागणी त्यांनी केली.

घटनेनंतर चार दिवस उलटूनही घुले कुटुंबीयांनी मृतदेह ताब्यात घेऊन अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला आहे. आरोपींना अटक आणि संपूर्ण कटाचा उलगडा करण्याच्या मागणीसाठी नागरिकांनी केज बंदची हाक दिली असून विविध ठिकाणी आंदोलन आणि रास्ता रोको सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी विधानसभेत पोलिसांना सर्व बाजूंनी निष्पक्ष तपासाचे निर्देश देण्याची मागणी केली. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या प्रकरणाची दखल घेत गृह विभागाला आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले.

दरम्यान, मंत्री पंकजा मुंडे यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशी चर्चा करून घटनेची माहिती घेतली. विलास घुले यांचा मृत्यू अत्यंत वेदनादायी असून त्यांचा या वादाशी थेट संबंध नसताना त्यांना जीव गमवावा लागला, असे त्या म्हणाल्या. दोषींना कोणत्याही दबावाशिवाय शिक्षा व्हावी आणि तपास पूर्णपणे निष्पक्ष व्हावा, अशा सूचना पोलिस प्रशासनाला दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, या प्रकरणाबाबत मुख्यमंत्री यांच्याशीही चर्चा करणार असल्याचे स्पष्ट करत घुले कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण त्यांच्या पाठीशी असल्याचे पंकजा मुंडे यांनी म्हटले.

### खासदार बजरंग बप्पाच्या लेकावर मोठा आरोप

विलास घुले हत्या प्रकरणात मुख्य सूत्रधाराला अटक करा या मागणीसाठी नातेवाईक गेल्या तीन दिवसापासून आक्रमक आहेत. सौरभ बजरंग सोनवणे याच्यावर गुन्हा दाखल करा. आरोपी मारहाण करताना सौरभ बजरंग सोनवणेचे नाव घेत होते त्यांच्या पाठबळामुळेच हे सगळे कृत्य घडले आहे, त्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी विलास घुले याचा भाऊ रमेश घुले याने केला आहे.

# विधान परिषदेत के.ई.एम रुग्णालयाच्या नामांतराचा वाद पेटला!

**महाईन्यूज । मुंबई**

**देशभरातील सर्वसामान्य रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेल्या परळ येथील के.ई.एम. रुग्णालयाचे नाव बदलण्याचा प्रस्ताव पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुंबई महानगरपालिकेकडे दिला आहे. यावरून काही दिवसांपूर्वी राजकीय वर्तुळात जोरदार गदारोळ झाला होता. आता हाच मुद्दा पुन्हा एकदा विधान परिषदेत उपस्थित करण्यात आला असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी यासंदर्भात आक्रमक भूमिका घेतली. त्यावर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सरकारची बाजू मांडली.**




विधान परिषदेत मुद्दा उपस्थित करताना मिलिंद नार्वेकर म्हणाले, “के.ई.एम. हॉस्पिटलचे नामांतर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मुंबईत प्लेगची साथ आली असताना किंग एडवर्ड यांनी दिलेल्या निधीतून हे रुग्णालय उभारण्यात आले. त्यामुळे किंग एडवर्ड या व्यक्तीवर इतका राग का आहे? ते काही अतिरेकी नव्हते की ज्यांच्या नावाच्या रुग्णालयाचे तातडीने नामांतर करावे. मंगलप्रभात लोढा यांच्याकडून ‘कौशल्य एकलव्य मेमोरियल रुग्णालय’ असे नाव ठेवण्याचा प्रस्ताव आहे. मग किंग एडवर्ड यांच्या नावाचा मान कसा राखणार? हे नामांतर करण्याचा आटापिटा नेमका कशासाठी आणि यामागील खरी कारणे काय?”

नार्वेकरांच्या या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी उपरोधिक टोला लगावला. ते म्हणाले, “मिलिंद नार्वेकरांनी के.ई.एम. रुग्णालयाचा महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. त्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही चांगले संबंध आहेत आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही उत्तम सलोखा आहे. त्यांनी या विषयावर थेट फोनवर संवाद साधला असता किंवा कालसारखे एखादे सुंदर ट्वीट केले असते, तरी हा प्रश्न सुटला असता.”

पुढे बोलताना सामंत यांनी स्पष्ट केलं की, “किंग एडवर्ड यांच्या देणगीतूनच हे हॉस्पिटल उभे राहिले, हे सत्य आहे. पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यासंदर्भात प्रस्ताव पाठवला होता, ही गोष्ट देखील खरी आहे. मात्र, या प्रस्तावातील सर्व मुद्द्यांची कायदेशीर आणि ऐतिहासिक तपासणी केली जाईल. के.ई.एम. रुग्णालयाला एक ऐतिहासिक वारसा आहे. त्यामुळे भविष्यात कोणतीही कायदेशीर किंवा सामाजिक अडचण निर्माण होणार नाही, याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. तसेच, नाव बदलल्यास रुग्णालयाच्या प्रशासकीय यंत्रणेवर काही परिणाम होईल का, याचाही विचार करावा लागणार आहे.”

या चर्चेत सहभाग घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे दुसरे आमदार सचिन अहिर यांनी पालकमंत्र्यांवर थेट टीका केली. ते म्हणाले, “पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांना नामांतराची इतकीच हौस असेल, तर त्यांनी त्यांच्या ‘ट्रम्प टॉवर’चे नामकरण करायला हवे होते, आम्ही त्याचे स्वागतच केले असते. सध्या या सरकारी रुग्णालयात वैद्यकीय सुविधा अपुऱ्या आहेत, प्रशासनाने त्या सुविधा सुधारण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ‘मार्ड’सारख्या डॉक्टरांच्या संघटनांनीही या नामांतराला तीव्र विरोध केला आहे. त्यामुळे सरकारला असा कोणताही प्रस्ताव मान्य नाही, अशी थेट घोषणा मंत्र्यांनी सभागृहात करावी.”

# लखनऊ आग प्रकरणात मोठा खुलासा!

## अवैध बांधकामामुळे २०१६ मध्ये पाडण्याचे आदेश, दोन महिन्यांतच फाईल बंद

**महाईन्यूज । लखनऊ**

**लखनऊमधील एका तीन मजली व्यावसायिक इमारतीला सोमवारी दुपारी ३ च्या सुमारास लागलेल्या आगीत ॲनिमेशन प्रशिक्षण केंद्रातील १५ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर सात जण गंभीर भाजले आहेत. या इमारतीविषयी आता धक्कादायक माहिती समोर आली आहे. ही इमारत बेकायदेशीर असून हे बांधकाम पाडण्याची नोटीस २०१६ मध्ये बजावण्यात आली होती, असं लखनऊ विकास प्राधिकरणाच्या (LDA) नोंदीतून समोर येतंय. मात्र, नोटीस आल्यानंतर दोन महिन्यानंतर पाडकामाचा आदेश मागे घेण्यात आला होता.**






अधिकाऱ्यांनी सांगितलं की, अलीगंज योजनेच्या सेक्टर 'डी' मधील 'MS/102/D' ही मालमत्ता ११ जुलै १९८० रोजी एका लॉटरीद्वारे एलडीएच्या 'हायर-परचेस' (भाडे-खरेदी) योजनेअंतर्गत विजय कुमार यांना देण्यात आली होती. नोव्हेंबर १९८० मध्ये कराराची अंमलबजावणी झाल्यानंतर, या मालमत्तेचा ताबा संबंधित व्यक्तीकडे सुपूर्द करण्यात आला. पुढे २००५ मध्ये, एका विक्री पत्राद्वारे (सेल डीड) ही मालमत्ता विजय कुमार आणि त्यांची पत्नी उषा यांच्या नावावर नोंदवण्यात आली. १९ जानेवारी २०१३ रोजी या दाम्पत्याने ही मालमत्ता वीरेंद्र प्रताप शुक्ला आणि सुरेंद्र प्रताप शुक्ला यांना विकली, त्यानंतर एलडीएने ७ ऑगस्ट २०१४ रोजी ही मालमत्ता त्यांच्यावर नावावर केली.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, प्राधिकरणाच्या 'सेल्फ-सर्टिफिकेशन' योजनेअंतर्गत २० ऑगस्ट २०१४ रोजी या १,९९२ चौरस फुटांच्या भूखंडावर निवासी इमारत योजनेला मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर, एलडीएला त्या ठिकाणी कथित अनधिकृत बांधकाम आढळून आले आणि त्यांनी वीरेंद्र प्रताप शुक्ला यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर सक्षम प्राधिकरणाने १० मे २०१६ रोजी इमारत पाडण्याचा आदेश दिला. परंतु, उपलब्ध नोंदींवरून असं दिसून येतंय की, दोन महिन्यांपेक्षा कमी कालावधीत म्हणजेच ५ जुलै २०१६ रोजी हा पाडण्याचा आदेश रद्द करण्यात आला. हा आदेश नेमका कोणत्या कारणांमुळे मागे घेण्यात आला, हे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलेले नाही.

सोमवारी लागलेल्या या आगीच्या पार्श्वभूमीवर, आता या इमारतीचा नियामक इतिहास आणि नियमांचं पालन झालं होतं की नाही, या बाबींकडे लक्ष वेधलं गेलं आहे. अधिकाऱ्यांनी सांगितलं की, या घटनेनंतर सुरू असलेल्या चौकशीचा एक भाग म्हणून मंजुरी, मालकी हक्कातील बदल आणि अंमलबजावणीच्या कारवाईशी संबंधित सर्व नोंदीची पुनर्तपासणी केली जात आहे.

### पेट क्लिनिकलाही आगीची झळ

या इमारतीत ॲनिमेशन प्रशिक्षण केंद्रासह पाळीव प्राण्यांचे क्लिनिक आहे. त्यामुळे काही प्राण्यांनाही आगीची झळ बसली. आग संपूर्ण इमारतीत पसरत असल्याचे लक्षात येताच इमारतीमध्ये अडकलेल्या अनेकांनी जिवाच्या आकांताने खाली उड्या मारल्या. अलीगंज भागातील उषा मेहता मार्गावर हा प्रकार घडला. आग नेमकी कशामुळे लागली याबद्दल अद्याप स्पष्टता नाही. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, आग आणि धुरामुळे घाबरलेल्या काही विद्यार्थ्यांनी स्वत:चा जीव वाचवण्यासाठी इमारतीतून खाली उड्या मारल्या. काही विद्यार्थी स्वत: बाहेर पडण्यात यशस्वी झाले, मात्र अनेक जण वरच्या मजल्यांवर अडकून पडले.

# डोनाल्ड ट्रम्प यांचे इशाऱ्यांवर इशारे आणि आखातात कायम युद्धाचे वारे!

**महाईन्यूज । अमेरिका**

**"इराणने कराराचे पालन केले नाही, तर आवश्यक ती कडक कारवाई केली जाईल", असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी दिला. स्वित्झर्लंडमध्ये इराणशी झालेल्या सांमजस्य करारानंतर ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला आहे. जागतिक आर्थिक मंदीच्या धोक्यापेक्षाही इराणला अण्वस्त्र मिळवण्यापासून रोखणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे ट्रम्प यांनी नमूद केले. व्हाईट हाऊसमध्ये एका कार्यक्रमादरम्यान ट्रम्प माध्यमांशी बोलत होते.**



"सामंजस्य करारात नमूद करण्यात आलेल्या गोष्टींचे इराणने पालन न केल्यास कठोर पाऊल उचलले जाईल", असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले. "इराणने कराराचे पालन केले नाही किंवा त्यांची वर्तणूक योग्य राहिली नाही, तर मला जे करावं लागेल ते मी नक्कीच करेन. इराण आमचा आदर करेल, तोपर्यंत कोणतीही अडचण येणार नाही," असे ट्रम्प माध्यमांशी बोलताना म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प यांनी यावेळी इराणवरील लष्करी कारवाईमुळे आर्थिक मंदी येण्याची भीती फेटाळून लावली.

आर्थिक मंदीवर बोलताना ट्रम्प म्हणाले की, "मी ज्या पद्धतीने हे हाताळत आहे, त्याने मंदी येणार नाही. आर्थिक मंदीपेक्षा अण्वस्त्रांचा प्रसार हा अत्यंत गंभीर धोका आहे." अण्वस्त्रांच्या धोक्याबाबत बोलताना, इराणने कराराचे पालन केले नाही, तर अण्वस्त्रांचा धोका मंदीपेक्षा खूप मोठा आहे. मंदी ही नक्कीच वाईट गोष्ट आहे... पण अण्वस्त्रे त्याहूनही अधिक वेगाने मंदी आणू शकतात", असे ट्रम्प म्हणाले. इराणने कराराचे पालन न केल्यास लष्करी पर्याय खुला आहे, असा इशारा देखील ट्रम्प यांनी यावेळी दिला.

### चर्चेची पहिली फेरी

स्वित्झर्लंडमध्ये रविवारी अमेरिका आणि इराण यांच्यात १४ कलमी सामंजस्य करार पार पडला. शांतता आणि स्थैर्यासाठी मजबूत पाया तयार केल्याचे अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे.डी व्हॅन्स म्हणाले. इराणच्या अणु कार्यक्रमावरील देखरेखीशी संबंधित यंत्रणा स्थापित करण्यात आल्याची माहिती यावेळी व्हॅन्स यांनी दिली. स्वित्झर्लंडमध्ये अमेरिका-इराण शांतता चर्चेची पहिली फेरी सोमवारी संपली. अमेरिकेने इराणवरील तेल निर्बंध तात्पुरते उठवले असून, इराणचा गोठवलेला निधी देण्याचेही मान्य केले आहे. होर्मुझ सामुद्रधुनी पूर्णपणे खुली करण्यावर देखील दोन्ही देशांमध्ये एकमत झाले आहे.

# शर्वरीचा ग्लॅमरस अंदाज

बॉलिवूडमधील लोकप्रिय युवा अभिनेत्री शर्वरी वाघ सध्या तिच्या आगामी 'अल्फा' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. दमदार अभिनयासोबतच तिच्या स्टायलिश फॅशन सेन्समुळेही ती नेहमीच चाहत्यांच्या चर्चेचा विषय ठरते. आता पुन्हा एकदा तिच्या नव्या ग्लॅमरस लूकने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. 'अल्फा' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी शर्वरीने एक खास आणि आकर्षक लूक निवडला आहे. तिचे हे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून चाहत्यांकडून त्याला भरभरून प्रतिसाद मिळत आहे. या नव्या फोटोंमध्ये शर्वरीचा अत्यंत फ्रेश, मॉडर्न आणि ग्लॅमरस अंदाज पाहायला मिळत आहे. साधेपणा आणि स्टाईल यांचा सुंदर मिलाफ तिच्या या लूकमध्ये दिसून येत आहे. या खास लूकसाठी शर्वरीने पांढऱ्या रंगाचा नेट डिझाईन असलेला आणि मोत्यांनी सजवलेला आकर्षक टॉप परिधान केला आहे. या टॉपमुळे तिच्या संपूर्ण लूकला एक एलिगंट आणि क्लासी टच मिळाला आहे. या टॉपसोबत तिने निळ्या रंगाचा शॉर्ट डेनिम स्कर्ट परिधान केला आहे. या कॉम्बिनेशनमुळे तिचा लूक अधिक तरुण, स्टायलिश आणि ट्रेंडी दिसत आहे. याशिवाय तिने हाफ-बन हेअरस्टाईल केली असून मोठे सिल्व्हर इअरिंग्स घालून लूक पूर्ण केला आहे. तिच्या मिनिमल मेकअपनेही चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. शर्वरीच्या या नव्या फॅशन स्टेटमेंटमुळे सोशल मीडियावर तिच्या फोटोंची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. अनेक चाहत्यांनी तिच्या लूकचं कौतुक करत विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. दरम्यान, शर्वरीचा आगामी 'अल्फा' हा चित्रपट ३ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये आधीपासूनच मोठी उत्सुकता आहे. प्रमोशनदरम्यान शर्वरीचे नवे लूक आणि तिची उपस्थिती चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढवत आहेत. गेल्या काही वर्षांत शर्वरी वाघने तिच्या अभिनयाने बॉलिवूडमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अभिनयासोबतच तिची फॅशन स्टाईलही तरुणाईमध्ये लोकप्रिय झाली आहे. ती अनेकदा तिच्या वेगवेगळ्या लूकमुळे सोशल मीडियावर चर्चेत असते. आता 'अल्फा' चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा तिच्या स्टायलिश अवताराने चाहत्यांना भुरळ घातली आहे. त्यामुळे आगामी चित्रपटाबरोबरच तिच्या फॅशनचीही जोरदार चर्चा रंगली आहे.





## 'कॉकटेल 2'चा दबदबा

शाहिद कपूर, कृती सेनन आणि रश्मिका मंदाना स्टारर 'कॉकटेल २' Cocktail 2 हा चित्रपट १९ जून रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. बॉक्स ऑफिसवर 'मैं वापस आऊंगा', 'गव्हर्नर' आणि 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटांची गर्दी असतानाही, अवघ्या एका आठवड्यात प्रदर्शित झालेल्या 'कॉकटेल २'ने बॉक्स ऑफिसवर दमदार सुरुवात केली आहे. होमी अदजानिया दिग्दर्शित 'कॉकटेल २' या रोमँटिक ड्रामा चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या वर्षात रोमँटिक चित्रपटांना बॉक्स ऑफिसवर फारसं यश मिळालं नसल्याने, या चित्रपटाकडून चित्रपटसृष्टीला मोठ्या अपेक्षा आहेत. सुरुवातीच्या आकडेवारीनुसार, 'कॉकटेल २'ने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर १३ कोटी ५० लाख रुपयांची शानदार कमाई केली आहे. हे प्राथमिक आकडे असून अधिकृत आकडेवारीनंतर यात काहीसा बदल होऊ शकतो.



# टॉक्सिकची ईठा सोबत टक्कर..



चित्रपटसृष्टीत दोन मोठ्या चित्रपटांची टक्कर होणे ही प्रेक्षकांसाठी नेहमीच उत्सुकतेची बाब असते. आता २०२६ मधील सर्वात मोठा आणि बहुप्रतीक्षित बॉक्स ऑफिस क्लॅश अधिकृतपणे निश्चित झाला आहे. साऊथचा 'रॉकिंग स्टार' यश आणि बॉलिवूडची आघाडीची अभिनेत्री श्रद्धा कपूर यांचे आगामी चित्रपट एकाच आठवड्यात बॉक्स ऑफिसवर आमनेसामने येणार आहेत. 'टॉक्सिक: अ फेअरिटेल फॉर ग्रोन-अप्स' आणि श्रद्धाचा 'ईठा' या चित्रपटांमध्ये ही लढत पाहायला मिळणार आहे. साऊथ सुपरस्टार यशच्या 'टॉक्सिक'च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर होताच चाहत्यांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, या चित्रपटाच्या रिलीज शेड्यूलमध्ये निर्मात्यांनी अनेक वेळा बदल केले आहेत. सुरुवातीला हा चित्रपट १९ मार्च रोजी प्रदर्शित होणार होता. त्यानंतर ही तारीख बदलून ४ जून २०२६ करण्यात आली. परंतु, काही कारणास्तव निर्मात्यांनी यात पुन्हा बदल करत आता हा पॅन-इंडिया ॲक्शन ड्रामा २६ ऑगस्ट रोजी जगभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित करण्याचे अधिकृतपणे जाहीर केले आहे. २६ ऑगस्टला अवघ्या दोन दिवसांनंतर म्हणजेच २८ ऑगस्ट रोजी श्रद्धाचा 'ईठा' चित्रपटगृहांमध्ये धडकणार आहे. 'ईठा' हा एक महत्त्वपूर्ण चित्रपट असून याचे दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केले आहे. या चित्रपटात श्रद्धा लावणीसम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांची मध्यवर्ती भूमिका साकारत आहे. दोन्ही चित्रपटांचे विषय आणि जॉनर पूर्णपणे वेगळे असले, तरी प्रेक्षकांना चित्रपटगृहाकडे खेचण्यासाठी दोन्ही स्टार्स सज्ज झाले आहेत. २०२६ मधील या सर्वात मोठ्या संघर्षात बॉक्स ऑफिसवर कोण बाजी मारणार, याकडे आता संपूर्ण चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले आहे.

# T20 मालिकेपूर्वी टीम इंडियाला झटका

## भारतीय संघाचा आयर्लंड दौरा येत्या २६ जूनपासून सुरू; अचानक मोठा बदल

**महाईन्यूज । मुंबई**

**भारतीय क्रिकेट संघाच्या आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यापूर्वी टीम इंडियाला एकापाठोपाठ एक मोठे धक्के बसले आहेत. स्टार फिरकीपटू वरुण चक्रवर्तीपाठोपाठ आता फॉर्मात असलेला अष्टपैलू खेळाडू नितीश कुमार रेड्डी दुखापतीमुळे आगामी आंतरराष्ट्रीय टी-२० (T20I) मालिकेतून बाहेर पडला आहे. आगामी आव्हानात्मक दौरा लक्षात घेता, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) नितीश रेड्डीचा पर्याय म्हणून मुंबईच्या युवा आणि आक्रमक सूर्यांश शेडगेची भारतीय संघात निवड केली आहे.**




भारतीय संघाचा आयर्लंड दौरा येत्या २६ जूनपासून सुरू होत असून, या दौऱ्यात संघ दोन टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहे. त्यानंतर लगेचच १ जुलैपासून भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर जाणार असून तिथे ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाईल. मात्र, या दोन्ही महत्त्वाच्या मालिकांना नितीश रेड्डी मुकणार असल्याने भारतीय संघाच्या चिंतेत भर पडली आहे.

अफगाणिस्तानविरुद्ध झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यानंतर नितीश रेड्डीने डाव्या पायाच्या स्नायूंमध्ये त्रास होत असल्याची तक्रार केली होती. त्यानंतर करण्यात एमआरआय चाचणी करण्यात आली. यात पायाला सूज असल्याचे स्पष्ट झाल. बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्याला बंगळुरू येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स' (COE) येथे पुनर्वसन (REHABILITATION) प्रक्रियेतून जाण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे तो आगामी एकूण ७ टी-२० सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही.

नितीश रेड्डी व्यतिरिक्त फिरकीपटू वरुण चक्रवर्ती देखील आयपीएल २०२६ (IPL 2026) दरम्यान डाव्या पायाला झालेल्या दुखापतीमुळे सध्या बंगळुरूमध्ये रिहॅब प्रक्रियेत आहे. खेळाडूंच्या फिटनेसला प्राधान्य देत व्यवस्थापनाने घाईगडबडीत त्यांना मैदानात न उतरवण्याचा निर्णय घेतला आहे.

### सूर्यांश शेडगेला उत्कृष्ट कामगिरीचे फळ

२३ वर्षीय अष्टपैलू खेळाडू सूर्यांश शेडगेला श्रीलंका येथे नुकत्याच पार पडलेल्या त्रिकोणी मालिकेत भारत 'अ' संघासाठी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचे बक्षीस मिळाले आहे. सूर्यांशने या स्पर्धेत मध्यक्रमात फलंदाजी करताना ५ सामन्यांत १४७ धावा केल्या, तसेच २३ षटके गोलंदाजी करत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. याशिवाय, २०२४-२५ मध्ये सय्यद मुश्ताक अली करंडक जिंकणाऱ्या मुंबई संघाचा तो महत्त्वाचा शिलेदार होता. या स्पर्धेत त्याने खालच्या मध्यक्रमात फलंदाजी करताना २५१.९२ च्या तुफानी स्ट्राईक रेटने १३१ धावा कुटल्या होत्या. त्याची हीच अष्टपैलू क्षमता पाहून निवड समितीने त्याच्यावर विश्वास दाखवला आहे.

### आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघ

आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी श्रेयस अय्यर याच्याकडे भारतीय संघाचे नेतृत्व सोपविण्यात आले असून अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन, शिवम दुबे, उपकर्णधार तिलक वर्मा, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव सूर्यवंशी, प्रसिद्ध कृष्णा आणि सूर्यांश शेडगे यांचा संघात समावेश करण्यात आला आहे. इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठीही श्रेयस अय्यर याच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली असून अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन, शिवम दुबे, उपकर्णधार तिलक वर्मा, सूर्यांश शेडगे, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव सूर्यवंशी, प्रसिद्ध कृष्णा आणि वरुण चक्रवर्ती यांना संघात स्थान देण्यात आले आहे.

# लिओनेल मेस्सीचा महाविक्रम! मिरोस्लाव क्लोसचा १२ वर्षांचा रेकॉर्ड मोडला

**महाईन्यूज । डॅलस**

**अर्जेन्टिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने फुटबॉल जगतात पुन्हा एकदा एका नव्या सुवर्ण अध्यायाची नोंद केली आहे. फिफा विश्वचषक २०२६ (FIFA WORLD CUP 2026) मधील ऑस्ट्रियाविरुद्धच्या सामन्यात गोल करत मेस्सीने पुरुषांच्या फिफा विश्वचषक इतिहासात सर्वाधिक गोल करण्याचा ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर केला आहे. या १७ व्या विश्वचषक गोल्सह त्याने जर्मनीचा दिग्गज खेळाडू मिरोस्लाव क्लोसचा तब्बल १२ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे.**




सोमवार, २२ जून रोजी झालेल्या ग्रुप 'जे' (Group J) मधील ऑस्ट्रियाविरुद्धच्या सामन्यात मेस्सीने हा पराक्रम केला. सामन्याच्या सुरुवातीला म्हणजेच ९ व्या मिनिटाला अर्जेन्टिनाला पेनल्टी मिळाली होती, मात्र मेस्सीचा हा शॉट गोलपोस्टच्या बाहेर गेल्याने मैदानात काही काळ शांतता पसरली होती. परंतु, ही निराशा मेस्सीने फार काळ टिकू दिली नाही.

सामन्याच्या ३८ व्या मिनिटाला सहकाऱ्यांकडून मिळालेल्या अचूक पासेसचा फायदा उठवत मेस्सीने डी-बॉक्सच्या जवळून एक अप्रतिम आणि वेगवान शॉट मारत चेंडू थेट गोलपोस्टच्या डाव्या कोपऱ्यात धाडला.

३८ वर्षे ३६३ दिवस वय असलेल्या मेस्सीने आपल्या ३९ व्या वाढदिवसाच्या अवघ्या दोन दिवस आधी हा पराक्रम केला. याशिवाय तो २००६, २०१०, २०१४, २०१८, २०२२ आणि २०२६ अशा तब्बल ६ वेगवेगळ्या विश्वचषक स्पर्धांमध्ये खेळणारा जगातील पहिला पुरुष फुटबॉलपटू ठरला आहे. यंदाच्या विश्वचषकात मेस्सी उत्कृष्ट फॉर्ममध्ये असून त्याने अवघ्या दोन सामन्यांत ४ गोल केले आहेत, ज्यात अल्जेरियाविरुद्धच्या पहिल्या सामन्यातील धडाकेबाज हॅट्रिकचा समावेश आहे. विद्यमान विश्वविजेत्या अर्जेन्टिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीने मिळवलेले हे यश त्याच्या आजवरच्या फुटबॉल कारकिर्दीतील सर्वात महान आणि अविस्मरणीय कामगिरी पैकी एक ठरले आहे.

### मिरोस्लाव क्लोसला टाकले मागे

या गोलसह मेस्सीच्या विश्वचषक कारकिर्दीतील एकूण गोल्सची संख्या आता १७ झाली आहे. यापूर्वी हा विक्रम जर्मनीच्या मिरोस्लाव क्लोसच्या नावावर होता, ज्याने २०१४ च्या विश्वचषकात आपला १६ वा गोल करून इतिहास रचला होता. तब्बल १२ वर्षांनंतर मेस्सीने त्याला मागे टाकत विश्वचषकाचा मुकुट परिधान केला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। बुधवार ।
दि. 24 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# कुदळवाडीतील भंगार गोदामाला भीषण आग

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

चिखलीतील कुदळवाडी परिसरातील डायमंड चौक येथे असलेल्या एका भंगाराच्या गोदामाला मंगळवारी (दि. २३) पहाटे भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. पहाटे सुमारे चारच्या सुमारास आग लागल्याची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळी अग्निशामक दलाचे तब्बल दहा बंब दाखल झाले. गोदामात मोठ्या प्रमाणात भंगार साहित्य असल्याने आग वेगाने पसरली होती. त्यामुळे जवानांना आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अनेक तास शर्थीचे प्रयत्न करावे लागले. पाण्याचा सतत मारा करून अखेर आग आटोक्यात आणण्यात यश आले.

आग नियंत्रणात आल्यानंतरही गोदामातील काही ठिकाणी धुमस सुरू असल्याने जवानांकडून कुलिंग ऑपरेशन सुरू आहे. आग शेजारील परिसरात पसरू नये, यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली.

या आगीत गोदामातील भंगार साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झालेली नसल्याची माहिती अग्निशामक विभागाकडून देण्यात आली.

## आगीचे कारण अद्याप अस्पष्ट

दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शॉर्टसर्किट, रासायनिक प्रतिक्रिया किंवा अन्य तांत्रिक कारणांमुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असला तरी अधिकृत कारण समोर आलेले नाही. संबंधित यंत्रणांकडून घटनेची चौकशी सुरू असून नुकसानीचा पंचनामा करण्यात येत आहे. पहाटेच्या वेळी लागलेल्या या आगीमुळे कुदळवाडी परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र अग्निशामक दलाच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*



**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp




CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW

D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पोलीस मुख्यालय, परेड ग्राउंड होणार ताथवडेत!

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आश्वासन; आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय, परेड ग्राउंड आणि इतर अनुषंगिक कार्यालयांसाठी ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या अधिपत्याखालील २० हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याचा मार्ग मोकळा झाला असून, यासंदर्भातील शासन निर्णय येत्या काही दिवसांत जारी होणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. तसेच, याबाबत महिन्याभरात मंत्रिमंडळात आवश्यक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.**



पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनासाठी स्वतंत्र आणि सुसज्ज मुख्यालय उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा आमदार महेश लांडगे यांनी राज्य शासनाकडे केला होता. त्यांच्या प्रयत्नांना आता यश येताना दिसत आहे. याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यावेळी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे,

मंत्रिमंडळाच्या दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत ताथवडे येथील वळुभाता प्रक्षेत्रातील एकूण ६७.९४ हेक्टर क्षेत्रापैकी २० हेक्टर जमीन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय, परेड ग्राऊंड व इतर आवश्यक कार्यालयांसाठी हस्तांतरित करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार गृह विभागाने महसूल विभागाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविला आहे. आमदार महेश लांडगे यांनी याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच महसूल आणि गृह विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे पोलीस आयुक्तालयासाठी स्वतंत्र प्रशासकीय संकुल उभारण्याचा महत्त्वाचा टप्पा आता पूर्णत्वास येत आहे.

> “पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या विस्तारामुळे स्वतंत्र आणि अत्याधुनिक पोलीस आयुक्तालयाची गरज अनेक वर्षांपासून भासत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात स्वतंत्र आयुक्तालय सुरू झाले. आता ताथवडे येथे पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय उभारण्यासाठी आवश्यक जमीन हस्तांतरणाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या अंतिम टप्प्यात आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत सकारात्मक आश्वासन दिले असून, येत्या महिनाभरात मंत्रिमंडळात निर्णय होण्याची अपेक्षा आहे. पोलीस प्रशासनाला सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यास शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होईल आणि नागरिकांना अधिक प्रभावी व जलद सेवा मिळेल. हा प्रकल्प पिंपरी-चिंचवडच्या सुरक्षित आणि नियोजित विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू

या प्रस्तावासंदर्भात काही विभागांकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. पशुसंवर्धन विभागाने संबंधित जागेची आवश्यकता असल्याचे नमूद केले असले, तरी शहराच्या कायदा व सुव्यवस्था व्यवस्थेसाठी आधुनिक पोलीस मुख्यालयाची गरज लक्षात घेऊन शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# महापालिका प्रशासकीय भवन अन् ‘अजित सृष्टी’चे एकत्रित लोकार्पण!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन मुख्य प्रशासकीय इमारतीच्या दुसऱ्या टप्प्यातील कामामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या ‘अजितसृष्टी’ या प्रकल्पाचा समावेश करावा, अशी आग्रही मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. नवीन प्रशासकीय भवन आणि ‘अजितसृष्टी’ या दोन्ही प्रकल्पांचे काम पूर्ण करून त्यांचे एकत्रित लोकार्पण व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.**




भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना यासंदर्भात एक सविस्तर पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, सध्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. याच इमारतीच्या आवारात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्याची स्मृती जपणारी ‘अजित सृष्टी’ उभारण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. मात्र, आता प्रशासकीय भवनाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामाची निविदा प्रसिद्ध करताना त्यात ‘अजित सृष्टी’ प्रकल्पाचाही समावेश करणे अपेक्षित असल्याचे आमदार लांडगे यांनी निदर्शनास आणून दिले आहे. मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारातच हा प्रकल्प उभारला जाणार असल्याने दोन्ही कामे एकाच वेळी पूर्ण होणे आवश्यक आहे. लोकनेते अजितदादा पवार यांनी महाराष्ट्र आणि विशेषतः पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात दिलेले योगदान बहुमोल आहे. शहराच्या विकासाचा हा इतिहास आणि अजितदादांच्या कार्याचा गौरव भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ‘अजितसृष्टी’ हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे, अशी भावना आमदार लांडगे यांनी पत्रात व्यक्त केली आहे.

> “पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासात लोकनेते अजितदादा पवार यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या कार्याचा गौरव आणि शहराच्या विकासाची वाटचाल पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी नव्या प्रशासकीय इमारतीसोबतच ‘अजितसृष्टी’चे काम पूर्ण होणे गरजेचे आहे. या दोन्ही वास्तूंचे एकत्रित लोकार्पण व्हावे, ही तमाम पिंपरी-चिंचवडकरांची लोकभावना आहे. यासाठी प्रशासकीय पातळीवर सर्वतोपरी पाठपुरावा करून हा प्रकल्प लवकरात लवकर शहरवासीयांच्या सेवेत रुजू करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याची मागणी

‘अजितसृष्टी’चे काम नवीन प्रशासकीय इमारतीच्या मूळ प्रकल्पामध्ये समाविष्ट करून, त्यासाठी आवश्यक असणारी प्रशासकीय, तांत्रिक आणि आर्थिक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली आहे. नवीन प्रशासकीय इमारत ही शहराच्या भविष्यातील विकासाचे प्रतीक असणार आहे. त्यामुळे ‘अजितसृष्टी’चे काम प्राधान्याने पूर्ण करून सर्वसाधारण सभेच्या निर्णयाला योग्य न्याय द्यावा आणि दोन्ही प्रकल्प एकाच वेळी शहरवासीयांच्या सेवेत दाखल करावेत, अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

# ४१२ कोटींचा मालमत्ता कर संकलन टप्पा पार

## मालमत्ता करावरील सवलतींचा लाभ घेण्यासाठी शेवटचे ७ दिवस उरले

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मालमत्ता कर संकलनात ४१२ कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. दि. १ एप्रिल २०२६ ते २२ जून २०२६ या कालावधीत ३ लाख ६५ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी जवळपास ४१२ कोटी १७ लाख रुपयांचा मालमत्ता कर भरला असून, कर संकलनात सातत्याने वाढ होत आहे.**




महापालिकेच्या १८ क्षेत्रीय कार्यालयांपैकी वाकड विभागाने सर्वाधिक ५६.३९ कोटी मालमत्ता कर संकलित केला आहे. तसेच, त्याखालोखाल थेरगाव विभागाने ३७.३६ कोटी, कस्पटे वस्ती विभागाने ३२.९१ कोटी, किवळे विभागाने ३०.३८ कोटी मालमत्ता कर संकलित केला आहे. याचबरोबर मालमत्ता कराच्या सामान्य करावर विविध प्रकारच्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता केवळ ७ दिवस शिल्लक राहिले आहेत. सवलतींची अंतिम मुदत ३० जून २०२६ असून नागरिकांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता त्वरित मालमत्ता कर भरून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने केले आहे.

महापालिकेकडून आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करावर १० टक्के सवलत देण्यात येत आहे. या सवलतीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दि. १ एप्रिल २०२६ ते २२ जून २०२६ या कालावधीत ३ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरून १० टक्के सवलतीचा लाभ घेऊन ३५८ कोटींचा ऑनलाईन भरणा केला आहे. नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेच्या सर्व विभागीय कार्यालयांमधील मालमत्ता कर काउंटर शनिवार व रविवारदेखील सुरू ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही आपल्या जवळच्या विभागीय कार्यालयात जाऊन मालमत्ता कर भरता येणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेच्या विभागीय कार्यालयांमध्ये शनिवार व रविवारदेखील मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. शेवटच्या दिवसांतील गर्दी टाळण्यासाठी नागरिकांनी जवळच्या विभागीय कार्यालयात किंवा ऑनलाइन माध्यमातून मालमत्ता कर भरावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले.

> पिंपरी चिंचवड शहराच्या विकासात प्रत्येक करदात्याचे योगदान महत्त्वाचे आहे. नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरल्यामुळे रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि इतर नागरी सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध करून देता येतात. महापालिकेने विविध सवलती उपलब्ध करून दिल्या असून, नागरिकांनी ३० जून २०२६ पूर्वी कर भरून या सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> – **रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> मालमत्ता कर हा महापालिकेच्या महसुलाचा प्रमुख स्रोत आहे. शहरातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसह विविध विकासकामांसाठी या निधीचा उपयोग केला जातो. ऑनलाइन कर भरणाऱ्यांसाठी १० टक्के सवलत तसेच इतर विविध सवलती उपलब्ध आहेत. नागरिकांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरित कर भरणा करून सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> – **डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# अनधिकृत टपऱ्यांवर महापालिकेची कारवाई!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांच्या परिसरातील अनधिकृत टपऱ्या, पानटपऱ्या आणि तत्सम अतिक्रमणांवर विशेष कारवाई करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच शैक्षणिक संस्थांच्या परिसरात स्वच्छ, सुरक्षित आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली.**



या मोहिमेदरम्यान मोरवाडी, आकुर्डी, चिंचवड, जाधववाडी, भोसरी, इंद्रायणीनगर, खराळवाडी, लांडेवाडी, दापोडी, जुनी सांगवी, थेरगाव आदी परिसरातील विविध शाळा आणि महाविद्यालयांच्या आजूबाजूला उभारण्यात आलेल्या अनधिकृत टपऱ्यांची पाहणी करण्यात आली. कारवाईदरम्यान एकूण ३५ अनधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्या, तर अनेक टपरीधारकांनी कारवाईची सूचना मिळताच स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतली. त्यामुळे परिसरातील अनधिकृत व्यावसायिक उपक्रमांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यात यश आले.

ही कारवाई केवळ अतिक्रमण हटविण्यासाठी नसून सार्वजनिक आरोग्य आणि तंबाखूमुक्त वातावरण निर्मितीसाठीही महत्त्वाची आहे. शाळा-महाविद्यालय परिसरातील अतिक्रमणे, अनधिकृत व्यवसाय आणि विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोहोचविणाऱ्या बाबींवर महापालिकेकडून नियमित कारवाई केली जाणार असून, अशा मोहिमा यापुढेही सातत्याने सुरू राहतील.



> "विद्यार्थ्यांचे सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरण राखणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. शाळा व महाविद्यालय परिसरातील अनधिकृत टपऱ्या आणि अतिक्रमणे हटविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून अशा कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहतील. विद्यार्थ्यांच्या हिताशी तडजोड होणार नाही यासाठी सर्व संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत."
>
> – **डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# मलेशिया सिलंबम स्पर्धेसाठी पिंपरी-चिंचवडचे २१ खेळाडू

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

जालना येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय सिलंबम अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारताच्या राष्ट्रीय संघाची निवड करण्यात आली असून १ व २ ऑगस्ट २०२६ रोजी मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सिलंबम अजिंक्यपद स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघामध्ये पिंपरी-चिंचवड शहरातील तब्बल २१ खेळाडूंची निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशामुळे शहराच्या क्रीडा क्षेत्रातील नावलौकिकात आणखी भर पडली आहे.

भारतीय संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूंमध्ये आदर्श केकंड, आदित्य टेळेकर, आनंद गायकवाड, अनन्या हेलावे, अथर्व कर्हाडे, देवराज भुटेकर, हर्षल धाने, काशिनाथ हेवळे, प्रिया सैनी, राज वायकोळे, ऋतुजा कुलकर्णी, साक्षी सैनी, श्रेया दांडे, सिद्धार्थ चौधरी, सूरज बांगर, सूरज टाळेकर, वैदेही नवले, वेदांत तापकीर, विश्वजीत पवार, यश बलगुडे आणि संजय बनसोडे यांचा समावेश आहे.

> मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सिलंबम स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेल्या पिंपरी-चिंचवडमधील सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन. त्यांची निवड ही त्यांच्या कठोर परिश्रमांची, शिस्तीची आणि समर्पणाची पावती आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना ते निश्चितच देशाचा आणि शहराचा गौरव वाढवतील, असा मला विश्वास आहे. त्यांच्या उज्ज्वल कामगिरीसाठी आणि यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.
>
> – **रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station